# चारोळ्या – भाग २५

तुझ्या नजरेच्या स्विंगनं
डोळे माझे फसले, अन्
सावरण्या आधीच माझी
विकेट उडवून गेले.

मला कधीच वाटलं नव्हतं
तू असा गुगली टाकशील
हंसत हंसत तू, हो म्हणशील, अन्
विकेट माझी काढशील.

नको विचारू
स्कोर किती
फॉलोऑनची
मला भीती.

विचारले प्रश्न मी मनाला
मिळाली, तीच ती उत्तरे
काही मला सुचेना
प्रश्न कसे, फुटूं लागले?

– पद्माकर चित्रे

('मी न माझा' या चारोळीसंग्रहातून)